महाराष्ट्र शासन

प्रमआयो-जी-२०२३/प्र.क्र.231/योजना-१०
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
बांधकाम भवन, २५ मझवान रोड,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक:-१६ ऑक्टोबर, २०२३.

प्रति,

१) विभागीय आयुक्त (सर्व)
२) मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).

**विषय:- मोदी आवास घरकुल योजना अंमलबजावणीसाठी कालबध्द कार्यक्रमाबाबत.**

**संदर्भ** :- १) इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्र. वगृयो-२०२३/प्र.क्र.३३/ योजना-५, दि.२८.०७.२०२३

२) इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्र. वगृयो-२०२३/प्र.क्र.३३/ योजना-५, दि. २७.०९.२०२३.

३) इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांचेकडील पत्र क्र.मोआयो-२०२३/प्र.क्र.७३ /योजना-५, दि. ०९.१०.२०२३.

४) या कार्यालयाकडील पत्र जा.क्र. /SMURH/राज्य योजना/२०२३/१६३२, दि. ०९.१०.२०२३.

सर्वांसाठी घरे २०२४" हे राज्यशासनाचे धोरण असून, त्यानुसार राज्यातील बेघर तसेच कच्च्या घरात वास्तव्यास असणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना "सन २०२४ पर्यंत स्वतःचे हक्काचे घर मिळावे असा प्रयत्न आहे. त्यानुसार राज्यात ग्रामीण भागातील बेघरांना घरकुल उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत विविध घरकुल योजना राबविण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमांतर्गत विविध योजनांतर्गत भूमीहिन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे करिता पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना तसेच निवासी प्रयोजनार्थ अतिक्रमणे नियमानुकूल करणे, शासकीय जमिनी विनामुल्य उपलब्ध करुन देणे इत्यादी कार्यक्रम राबविण्यात येतात.

संदर्भ क्र. १ व २ च्या शासन निर्णयान्वये, राज्यात इतर मागास प्रवर्ग (OBC) व विशेष मागास प्रवर्ग (SBC) साठी मोदी आवास घरकुल योजना सुरु करण्यात आली आहे. तसेच संदर्भ क्र. ३ अन्वये, मोदी आवास घरकुल योजनेचे उद्दिष्ट देखील प्राप्त झाले असून संदर्भ क्र. ४ अन्वये, सर्व जिल्ह्यांना कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने, राज्यात मोदी आवास घरकुल योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पुढीलप्रमाणे कालबध्द कार्यक्रम देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कृती | कालमर्यादा | जबाबदार अधिकारी/ कर्मचारी |
|---|---|---|---|
| १ | **उद्दिष्ट वाटपाची प्रक्रिया :-** | | |
| | मोदी आवास घरकुल योजनेंतर्गत इतर मागास व बहुजन कल्याण विभागामार्फत जिल्हानिहाय उद्दिष्ट वाटप करण्यात आले आहे. त्याच प्रमाणात सर्व जिल्ह्यांनी तालुक्यांना व तालुक्यांनी ग्रामपंचायतींना इतर मागास प्रवर्ग (OBC) व विशेष मागास प्रवर्ग (SBC) करीता उद्दिष्ट वाटपाची प्रक्रिया पूर्ण करावी. | दि. १८ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत | मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक व गट विकास अधिकारी |
| २ | **लाभार्थी निवड, नोंदणी व मंजूरी प्रक्रिया :-** | | |
| | १. मिळालेल्या उद्दिष्टानुसार ग्रामपंचायतींनी वरील संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयामध्ये नमूद अटीशर्तीनुसार पात्र लाभार्थ्यांची निवड करुन ग्रामसभेची मान्यता घेवून सदर प्रस्ताव तालुकास्तरावर सादर करावेत. | दि. ०५ नोव्हेंबर, २०२३ पर्यंत | ग्रामसेवक |
| | २. तालुकास्तरावरुन सदर प्रस्तावांची छाननी व स्थळ पाहणी करावी. त्यानुसार योग्य प्रस्ताव जिल्हास्तरीय निवड समिती समोर पाठवावेत. त्यासोबतच मोहिम स्वरुपात आवास सॉफ्ट प्रणालीवर छाननी व स्थळ पाहणी झालेल्या लाभार्थ्यांची नोंदणी प्रक्रिया (जॉब कार्ड, आधार कार्ड व बँक खाते इ. नोंदणी) करावी. | दि. १० नोव्हेंबर, २०२३ पर्यंत | गट विकास अधिकारी |
| | ३. सदर प्राप्त प्रस्तावामधून जिल्हास्तरीय समितीने लाभार्थ्यांची अंतिम मंजूरी करावी व त्यानुसार जिल्हास्तरावरुन सदर लाभार्थ्यांना Online मंजूरीची प्रक्रिया त्वरीत पूर्ण करावी. | दि. १५ नोव्हेंबर, २०२३ पर्यंत | मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक |
| ३ | **पहिला हप्ता वितरीत करणे:-** | | |
| | जिल्हास्तरावरुन आवास सॉफ्ट प्रणालीवर मंजूरी दिलेल्या लाभार्थ्यांना तालुकास्तरावरुन पहिला हप्ता तातडीने वितरीत करण्यात यावा. | दि. २० नोव्हेंबर, २०२३ पर्यंत | गट विकास अधिकारी व सहाय्यक लेखाधिकारी |
| ४ | **घरकुलांची कामे सुरु करणे:-** | | |
| | मंजूरी /पहिला हप्ता मिळालेल्या घरकुलांची कामे तातडीने सुरु होतील याची दक्षता घ्यावी. | दि. २० नोव्हेंबर, २०२३ पर्यंत | ग्रामसेवक |

तरी मोदी आवास घरकुल योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी वरील कालबध्द कार्यक्रम तंतोतंत राबविण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**(एकनाथ डवले,** भा.प्र.से.)
प्रधान सचिव

**प्रत :-**

१. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
२. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
३. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.